सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/खास
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २७० ठ. क्र. २६८
दि. २०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



डॉ. श्री. सचिन कुलकर्णी व डॉ. श्री. विनय चव्हाण यांचे मुदतवाढ व मानधनवाढीबाबत मा. आयुक्त यांचे मान्यतेने मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करणेकामी आलेल्या प्रकरणी मा. स्थायी समिती ठ.क्र. १८३, दि. १-७-१६ टिपणीचे अवलोकन करुन महानगरपालिकेच्या दवाखान्याकडे आजला अशा प्रकारे मानधनावर एकूण किती तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे त्यांना किती मानधन देण्यांत येतो, तसेच ते अर्धवेळ आहेत की पूर्ण वेळ सेवा देणारे आहेत. तसेच सदर दवाखान्याकडे आजच्या स्थितीत किती डॉक्टरांची आवश्यकता आहे ? या माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस, मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार प्रस्तावात सविस्तर माहिती सादर केले असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. स्थायी समितीने दिनांक १-७-१६ अन्वये दिलेल्या आदेशानुसार आरोग्याधिकारी यांनी प्रकरणी दि. ९-८-१६ रोजीने दिलेल्या माहितीनुसार दि. ९-६-२०१६ रोजी मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-१०-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. ५२८, दिनांक २१-१०-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच डॉ.शहा शोभा शिरीष, डॉ.जनई विद्या विनोद,डॉ.जेलर निलोफर अ.गफार आणि डॉ.बंदी सुरेशबाबू पंचारक्षप्पा यांना दि.७/५/२०१६ पासून मुदतवाढ दिली असून संबंधितास मानधन रू.२५०००/- ऐवजी रू.४००००/- इतके मानधन मुदवाढीचे दिनांकापासून करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ______/खास/विशेष
सर्व साधारण सभेपुढे ______ 2013 क्र 299
दि. 30/12/16 ...... रोजी ठेवला जाऊन प्रा. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नगरोत्थान राज्यस्तरीय योजने अंतर्गत रस्त्याच्या कामामध्ये (LR-२) पार्टमधील गंगा एक्सप्रेस फिडर रामवाडी दवाखाना ते शहा नगर यामधील इले.पोल (HT/LT.DTC) शिफ्टींग करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र./र.रु. १९,२८,१९६/- यांस मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २७-९-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २८१, दि. १७-१०-१६ नुसार मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सर्व साधारण सभेपुढे ठेवलेला क्र. 245 ठ. क्र. 240
दि. 10/12/2016 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



शहर सोलापूर टीपी-१ फा.प्लॉ.नं. २७ येथे हिंदू ह्दय सम्राट शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभे करणेचे अनुषंगाने आर्ट गॅलरी, लायब्ररी व सभागृह बांधणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे उक्त प्रकरणी हिंदू ह्दय सम्राट शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारणी करणेकामी डी.एस.आर. दर सन २०१६-१७ नुसार तयार करणेत आलेल्या र.रु. १०,९५,२६,०००/- इतक्या पुर्वगणनपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस व तसेच एकूण पूर्वगणनपत्रीकातील उर्वरीत र.रु. ९,५५,२६,०००/- इतकी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता तरतूद होऊन मिळणेस तसेच फेज-१ मध्ये कंपाउण्ड वॉल साईट डेव्हलपमेंट स्टिल्ट फ्लोअर व पहिला मजला इत्यादी कामाचा समावेश असून फेज १ ची पूर्वगणन पत्रकाची अंदाजीत किंमत रक्कम रू.५.१७ कोटी असून फेज १ करिता २ कोटीची तरतूद असून या कामी १.४० कोटी इतके बजेट अभिप्राय प्राप्त आहे. फेज १ ची निवीदा प्रक्रिया करण्या करिता रक्कम रू ५.१७ कोटी पैकी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता उर्वरीत बजेट र.रु. ३.७७ कोटी रुपयाची बजेट तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १५-१०-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यातील अ. क्र. ३५ नगरअभियंता भांडार याठिकाणी मिटींग हॉल व समित्यांचे कार्यालय बांधणे र.रु. २.०० कोटी व अ.क्र. ३६ मा. महापौर निवास/मा. आयुक्त निवास नविन बांधणे र.रु. २.०० कोटी पैकी र.रु. १.७७ कोटी असे एकूण र.रु. ३.७७ कोटी स्मारकाकरिता शिल्लक राहिलेल्या र.रु. २३.०० लाख कस्तुरबा मंडई बाळीवेस याठिकाणी म.न.पा.गाळे दुरुस्ती इतर सुविधा करणेकामी या दोन्ही तरतूदीतून बजेट तरतूद करणेस तसेच पंतप्रधान आवास योजनेतील म.न.पा. हिस्सा र.रु. २५ कोटीमधून र.रु. १० कोटी यामधून पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते व दिवाबत्ती याकरिता प्रत्येकी र.रु. २.५० कोटी निधी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 282 ठ. क्र. 209
दि. 30/11/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



देगाव येथील मलशुध्दीकरण केंद्रातुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर Tertiary Treatment करून NTPC ला सांडपाणी देणेचे कामासाठी NTPC सोबत करारपत्र करणेबाबत प्रस्तावात नमूद करण्यास्तव व प्रस्तावात नमूद केले प्रमाणे काम केल्यास सो.म.पा.स प्रस्तावातील १ ते ८ गोष्टी उपयुक्त होणार आहेत.सदर योजनेची कामे Swiss Challenge पध्दतीत ppp मॉडेलद्वारे संयुक्तीक राहील.सबब प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे NTPC व सोलापूर महानगरपालिका यांचे मध्ये करणेचा अंतिम करारपत्राचा मसुदा मंजुर होऊन NTPC ला प्रक्रिया केलेले सांडपाणी देण्यासाठीचे करारपत्र करणेस व वरील कामास मा. शासनाकडील सुचने प्रमाणे PPP अंतर्गत कंत्राटदार नेमणूकीसाठी निवीदा प्रक्रिया राबवणे व त्या अनुषंगाने मा. शासनाकडे आवश्यक ते पत्र व्यवहार करणे इ.कार्यवाही ठेवणेचे अनुषंगाने अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मा. सर्वसाधारण सेभेची मान्यता मिळणे कामी मा.आयुक्त यांचे दि. ९/११/२०१६ च्या टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती वेळोवेळी मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष 202
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 206 ठ. क्र........
दि. 30/7/16 ......रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत सोलापूर शहरातील जिल्हा प्रशिक्षण केंद्र होमगार्ड, विजापूर रोड, सोलापूर येथे विंधन विहीर घेऊन सबमर्सिबल पंप बसवून देणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे याकामी येणारा खर्च र.रु. ९७,८११/- यांस मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत सोलापूर शहरातील जिल्हा प्रशिक्षण केंद्र होमगार्ड, विजापूर रोड सोलापूर येथे विंधन विहीर घेऊन सबमर्सिबल पंप बसवून देणेस मा. म.न.पा.चे धोरणात्मक मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-१६ चे टिपणीप्रमाणे धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.258 ठ. क्र....213
दि.30/9/2016....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. ९ मधील तोडकरी वस्ती येथील सिटी सर्व्हे नंबर २४/३/ब/३ येथे व ही संपूर्ण रस्ता त्यांचे मालकीची जागा असून सदर जागेवर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांची कोणतीही परवानगी न घेता व त्यांचे कोणताही मोबदला न देता सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकून सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यांच्या जागेवर महानगरपालिकेने अतिक्रमण केले असून, त्यामुळे त्यांचे वहिवाटीमध्ये व वापरता असलेली जागेचा वापर त्यांना करता येईना. सदरची बाब ही बेकायदेशीर असून, त्यांचे हक्कावर गदा आणणारी आहे. सदर जागेचा चालू बाजार भावाप्रमाणे बाधीत जागेची मुल्यांकन करुन जागा मालकास नुकसान भरपाई देण्यास मान्यता देणेत येत आहे.

याकामी येणारा खर्च हा सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यातील अ.क्र. १३ भूसंपादन करणे/म.न.पा.जागा ताब्या घेणे/नुकसान भरपाई/खर्च वगैरे देणे या तरतूदीतून करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८६ ठ. क्र. 208
दि. १०/०७/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कु. केतन मुकुंद शिंदे, रहा. ९/१३३ रविवार पेठ, सोलापूर हा सोलापूरचा सुपुत्र असून त्याची सिंगापूर येथे होणा-या फर्स्ट एशियनन युथ गेम्स (डायव्हिंग) मध्ये निवड झालेली आहे. यामुळे निश्चितच सोलापूरच्या नावलौकिकामध्ये भर पडून खेळाच्या दृष्टीने चांगल्या प्रकारचे वातावरण शहरात निर्माण होणार असून, एका खेळाडूस प्रोत्साहन देणे हा यामध्ये मुख्य उद्देश राहणार आहे. त्याला सिंगापूर येथे जाऊन स्पर्धेमध्ये भाग घेण्याकरिता सोलापूर महानगरपालिकेकडून भरीव अशी आर्थिक मदत करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज २५७ ठ. क्र. २७५
दि. १०/१२/१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



महात्मा गांधी चौक (रेल्वे स्टेशन चौक) ते महापौर निवासकडे जाणा-या रस्त्यास स्वातंत्र्य सैनिक व माजी नगरसेवक **कै. मल्लीकार्जून शिवप्पा दुधनीकर मार्ग** असे नामकरण करण्यास सदर ठिकाणी नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८८ ठ. क्र. २७६
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



७० फूट रोड भाजी मंडई ते कुमठा नाका चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृती पित्यर्थ त्यांचे नाव प्रभागातील रस्त्यावरील चौकास देणे बाबत नागरिकांची मोठया प्रमाणात मागणी येत आहे. या साठी सदर ठिकाणी रस्त्यावरील चौकास छत्रपती शिवाजी महाराज मित्र प्रेम चौक असे नाव देणे उचीत होणार आहे.

तरी ७० फूट रोड भाजी मंडई ते कुमठा नाका चौक या रस्त्यावरील चौकास **छत्रपती शिवाजी महाराज मित्र प्रेम चौक असे** नामकरण करण्यास त्या प्रमाणे नाम फलक लावण्यास व या कामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.255.ठ. क्र....2100
दि.१०/०२/१६....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



हिंदी उर्दु कौमी एकता मंच सोलापूर ही एक नोंदणीकृत संस्था आहे. या संस्थेचा मार्च २०१६ पर्यंत ऑडीट पूर्ण झालेले आहे. या संस्थेच्या मार्फत मागील १० वर्षात अनेक कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत. या संस्थेचा मुख्य उददेश विविध भाषिकांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मता सुदृढ करणे असा असून अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम या संस्थेने आत्तापर्यंत केलेले असून त्याव्दारे राष्ट्रीय एकात्मा बळकटीकरण करण्याचा स्तुत्य उपक्रम अखंडपणे चालवलेला आहे.

प्रजासत्ताक दिना निमित्त २६ जानेवारी २०१७ पासून आंतरशालेय उर्दु देशभक्तीगीत स्पर्धा आयोजित करण्याचा संस्थेचा मानस असून दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. याचा अंदाजे खर्च रक्कम रूपये १.०० लाख इतका असून सोलापूर महानगरपालिकेतर्फे त्यांना दरवर्षी जास्तीत जास्त अनुदान देण्यास हि सभा मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.